# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

लोकमत | ३ | पुणे, शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०१५

### भोरगिरी-भीमाशंकर अभयारण्यात स्वच्छता

**राजगुरुनगर विद्यालयाचा उपक्रम : २०० स्वयंसेवक सहभागी**




भीमाशंकर-भोरगिरी अभयारण्यात स्वच्छता करताना हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी.

चासकमान : श्रावणी सोमवारचे औचित्य साधून भोरगिरी-भीमाशंकर अभयारण्यात हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबविली. या मोहिमेत जवळपास २०० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांनी भोरगिरी येथून अभयारण्यातून मधल्या मार्गावरुन पायी प्रवास करीत भीमाशंकरला गेले. विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी आणि पर्यटकांकडून अभयारण्यात टाकला जाणारा प्लॅस्टिकचा कचरा जमा व्हावा, यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी दिवसभर अभयारण्य परिसरात भटकंती करून शेकरु तसेच ब्लूमॉरमॉन फूलपाखराची ओळख करून घेतली. तसेच, इतर प्राणी व पक्षी यांची माहिती त्यांना देण्यात आली. भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील वाहनतळ, मंदिर पायऱ्या व परिसरातील मोठ्या प्रमाणात असलेला प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या घनकचरा विद्यार्थ्यांनी जमा केला.

वनचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन महाविद्यालयच्या वतीने दर वर्षी करण्यात येते. या उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. रुपाली वायाळ, प्रा. धनंजय वाघ, प्रा. मच्छिंद्र मुळूक, डॉ. महेश घाडगे, प्रा. काजल भुजबळ, प्रा. भाग्यश्री काळे, प्रा. नीलम कुटे, प्रा. अपर्णा कुलकर्णी, विद्यार्थी प्रतिनिधी आकाश नवरे, काजल बोऱ्हांडे यांनी प्रयत्न केले. (वार्ताहर)

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख